सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९२ | शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com






श्री. शिरीषदादा चौधरी
माजी आमदार, अमळनेर



नावीद शेख
नगरसेवक, अमळनेर



श्री. महावीर पहाडे
इंजिनिअर



श्री. विजय पाटील (विजूतात्या)
अमळनेर



श्री. चंद्रकांत भदाणे
अमळनेर



श्री. अजय सोनार
अमळनेर



श्री. उमेश बिऱ्हाडे
अमळनेर



श्री. भगवान काळे
अमळनेर

# वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने पिके आडवी

## शेतकरी कमालीचे चिंतेत; अमळनेरसह तालुक्यातील स्थिती





*अमळनेर : गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी वादळासह जोरदार पाऊस पडल्याने आडवे झालेले ज्वारीचे पीक. शेजारी एका शेत शिवारात ओला झालेला काढणीसाठीचा मका. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यात गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची सर्वत्र धांदल उडाली. निम, पाडळसरे, कळमसरे शहापूर, बोहरे, लोण, मुडी, मांडळ, पातोंडा, नगाव, देवगाव-देवळीसह जानवे, रणाईचे, पिंपळे, शिरूड आदी भागांत परिपक्व झालेला मका, बाजरी, ज्वारी आडवी पडली. तसेच काही ठिकाणी काढलेले अन्नधान्य पावसाच्या पाण्याने ओले झाले. काही ठिकाणी वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने डेरेदार वृक्षांच्या फांद्या तुटून पडल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने ते कमालीचे चिंतेत आहेत.

अमळनेरसह तालुक्यातील बऱ्याच भागांतील वीजपुरवठाही खंडित झाला होता. मात्र, रात्रभर महावितरण विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न केल्याने आज वीजपुरवठा सुरूळीत झाला.

अमळनेर शहरात रस्त्याच्या कडेला लावलेले डिजिटल बॅनर जोरदार वादळी वाऱ्यामुळे खाली कोसळले. तसेच भाजीपाला विक्रेते, हातगाडीवरून मालाची विक्री करणारे यांचीही मोठ्या प्रमाणावर धांदल उडाली. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे बसस्थानकात थांबलेल्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली.

### ‘महावितरण’च्या तत्परतेने वीजपुरवठा पूर्ववत

अमळनेर शहरासह संपूर्ण तालुक्यात गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी वादळी वाऱ्याने अक्षरशः रौद्र रूप धारण करत परिसरात मोठे नुकसान केले आहे. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून विजेच्या तारांवर पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. काही ठिकाणी वीज खांब वाकल्याने तारा एकमेकांत अडकल्या, तर रस्त्यांवर झाडांच्या फांद्या पडल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. या वादळामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली असून, परिसराला मोठा फटका बसल्याचे चित्र पाहावयास मिळाले. या परिस्थितीत जीव धोक्यात घालून उभे राहिले ते महावितरणचे कर्मचारी. तुटलेले खांब, एकमेकांत अडकलेल्या तारा, झाडांच्या मोडलेल्या फांद्या यामध्येही त्यांनी काम सुरू ठेवत वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले. अंधारात बुडालेल्या परिसरात पुन्हा उजेड आणण्यासाठी कर्मचारी रात्रभर झटत होते. महावितरण कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे अनेक भागांतील वीजपुरवठा तत्काळ पूर्ववत करण्यात यश आले.

### शेतकऱ्यांचे हाल अन् नुकसान

गेल्या चार महिन्यांपासून रब्बी हंगामासाठी हजारो रुपये खर्च करून शेतकरी बांधवांनी मका, गहू, बाजरी, ज्वारी आदी पिकांची पेरणी, लागवड केली होती. एवढा खर्च केल्यानंतर गुरुवारी झालेल्या वादळी पावसामुळे हाता-तोंडाशी आलेले उत्पन्न तसेच पिके वाया गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

## वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

### आमदार अनिलदादा पाटील यांचे तहसीलदारांना आदेश



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात गेले दोन दिवस वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे काढणीवर आलेली पिके तसेच शेत शिवारात काढणीसाठी पडलेले गहू, मका आदींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत, अशी सूचना वजा आदेश शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना दिले.

यासंदर्भात आमदार पाटील यांनी राज्याचे कृषिमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांशी देखील भ्रमणध्वनीद्वारे चर्चा करून शेतकऱ्यांची व्यथा मांडली. तालुक्यातील अनेक भागांत गेल्या दोन दिवसांत अवकाळी पावसाचा कहर पाहावयास मिळाला असून, २ एप्रिल रोजी सायंकाळी झालेल्या पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

अमळनेर तालुक्यातील चिमणपुरी-पिंपळे खुर्द, पिंपळे बुद्रुक, अटाळे, शिरसाळे, आर्डी, अनोरे, जवखेडा यांसह नीम, पाडळसरे, कळमसरे, बोहरा, मांडळ, वावडे, तसेच बोरी नदीकाठावरील तासखेडा, आमोदे, अंतुर्ली, रंजाणे या तालुक्यातील गाव परिसरात तसेच सर्वदूर जोरदार वादळ आणि वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचा मका, बाजरी, ज्वारी, दादर, गहू व इतर पिके आडवी पडली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी मका, गहू व इतर काढणीवर आलेली पिके कापून ठेवलेली असल्याने तीही पावसात सापडल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याची माहिती आमदारांनी कृषिमंत्र्यांना देऊन सदर पीडित शेतकरी बांधवांना शासनाने लवकरात लवकर मदत उपलब्ध करून द्यावी,अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अमळनेरमधून ओव्हरलोड वाळू वाहतूक

## धुळीचा विळखा; विनानंबर डंपरची मोठी संख्या; प्रशासनाचे दुर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या बेसुमार आणि अनियंत्रित वाळू वाहतुकीमुळे संपूर्ण शहर धुळीच्या विळख्यात सापडले आहे. ओव्हरलोड डंपर आणि उडणाऱ्या वाळू व धुळीमुळे मुख्य रस्ते अक्षरशः धूसर झाले आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांसह नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत आहे. मात्र, अशी स्थिती असताना प्रशासनाचे कमालीचे दुर्लक्ष होत आहे. त्यात विनानंबरचे ओव्हरलोड डंपर हे कुणाच्या मालकीचे आहेत, यासंदर्भातही नागरिकांत चर्चा आहे.

तालुक्यातील तापी व पांझरा या नद्यांच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करून ती डंपर, ट्रॅक्टरद्वारे शहरातून वाहतूक केली जात आहे. मात्र, या वाहनांवर ताडपत्री झाकणे सक्तीचे असताना ती झाकली जात नसल्याने चालत्या वाहनातून वाळूचे बारीक कण हवेत मिसळून उडत आहेत. गतिरोधकांच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जादा भरलेली वाळू या डंपरमधून खाली पडतानाही दिसून येते. विशेष म्हणजे सद्यःस्थितीत अनेक डंपर हे विनानंबरचे या मार्गाने धावत असल्याचे बोलले जात आहे.


आधीच अमळनेर-चोपडा या रस्त्याची झालेली दुरवस्था, त्यात ओव्हरलोड वाळू वाहतुकीचे डंपर सुसाट धावत असल्याने या रस्त्यांची अवस्था आणखी बिकट होत चालली आहे. अशा प्रकारच्या वाहतुकीमुळे शहरातील अंतर्गत रस्तेही पूर्णपणे खराब झाले आहेत. या रस्त्यांवर खड्डे, धूळ आणि सांडलेली वाळू पडलेली असल्याने या रस्त्यांवरून चालणे कठीण बनले असून, वाहने घसरण्याचे प्रमाणही वाढीस लागले आहे. धुळे रोड, चोपडा रोड, फरशी पूल, बसस्थानक परिसर ही मोठ्या प्रमाणावरील रहदारीची ठिकाणे असल्याने येथेही ही स्थिती असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. धुळीतील बारीक कणांमुळे काहींच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम जाणवायला लागले आहेत.

### दमा, ब्राँकायटिससारख्या श्वसनविकारांमध्ये वाढ

डोळ्यांचे आजार, डोळे लाल होणे, दृष्टी धूसर होणे, त्वचेवर रॅशेस व खाज, लहान मुले व ज्येष्ठांमध्ये खोकला, दम लागणे, ब्राँकायटिस, घशाचे संसर्ग अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, तरीही बेदरकार वाहतूक सुरूच असून, अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

## अमळनेर तालुक्यात २८ एप्रिलला पाच ग्रामपंचायतींची निवडणूक

### चोपडाई, अंतुली-रंजाणेत होणार थेट सरपंचपदाची निवड




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींसाठीचा निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहीर करण्यात आला आहे. येत्या मंगळवारी, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्यात चोपडाई आणि अंतुली-रंजाणे या गावांसाठी थेट सरपंचपदाची निवड होणार आहे.

चोपडाई व अंतुर्ली-रंजाणे येथील लोकनियुक्त सरपंचांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले असून थेट जनतेतून निवड होणार आहे. त्याचप्रमाणे मुंगसे येथील वॉर्ड क्र. ३ तर वॉर्ड क्र. १ मधील अनुसूचित जमातीच्या सदस्याचे निधन झाल्याने पुन्हा निवड होत आहे. नंदगाव-लडगाव व डांगर बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सदस्यांचे निधन झाल्याने दोन्ही पदे रिक्त आहेत. चोपडाई येथील वॉर्ड क्र. २ मधील सर्वसाधारण आणि वॉर्ड क्र. ३ मधील अनुसूचित जाती प्रवर्ग उमेदवारांनी राजीनामा दिल्याने दोन्ही पदे रिक्त झाली होती. ७ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान सुटीचे दिवस वगळून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. १५ एप्रिल रोजी छाननी होईल, तर १७ एप्रिलला निवडणूक चिन्हांचे वाटप होऊन २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

### जळगावच्या कृषी विज्ञान केंद्रात भ्रष्टाचार

# केंद्रीय कृषी मंत्रालयाचे खासदार स्मितताई वाघ यांनी वेधले लक्ष

## तत्काळ व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची संसदेत केली मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जिल्ह्यातील जळगावच्या कृषी विज्ञान केंद्रातील कथित भ्रष्टाचार, निधीचा गैरवापर आणि प्रशासकीय अनियमितता यासंदर्भात खासदार स्मिताताई वाघ यांनी संसदेत केंद्रीय कृषी व किसान कल्याण मंत्रालयाचे लक्ष वेधले. तसेच यावेळी या प्रकरणाची तत्काळ व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

महात्मा जोतिबा फुले कृषी विद्यापीठांतर्गत जळगाव येथील कृषी विज्ञान केंद्रात झालेल्या कथित अनियमितता आणि गैरकारभाराचा मुद्दा आमदार किशोर दराडे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधान परिषदेत नुकताच उपस्थित केला. या प्रकरणात संबंधित कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांना तातडीने निलंबित करण्याचे निर्देशही राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिल्याने मोठी खळबळ उडाली होती. मात्र, कृषिमंत्र्यांच्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर खासदार स्मिताताई वाघ यांनी थेट संसदेत कृषी विज्ञान केंद्रातील गैरकारभाराकडे कृषी मंत्रालयाचे लक्ष वेधले. त्या म्हणाल्या, की भारतीय कृषी अनुसंधान परिषद (आयसीएआर) मार्फत कृषी विज्ञान केंद्राला देण्यात येणाऱ्या निधीचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात जळगावच्या विज्ञान केंद्राकडून निधीचा अपव्यय होत असून, मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. कृषी विज्ञान केंद्राच्या परिसरातील जुनी व उपयुक्त झाडे अनधिकृतपणे तोडण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत. याशिवाय ट्रॅक्टर व इतर कृषी यंत्रसामुग्रीचा वैयक्तिक वापर केल्याचे आरोप असून, शासकीय संसाधनांचा गैरवापर झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मी स्वतः या केंद्राला भेट दिली असता अनेक त्रुटी आणि अनियमितता निदर्शनास आल्या. शेतकऱ्यांना अपेक्षित सुविधा मिळत नाहीत, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

### शेतकऱ्यांचा आवाज पोहोचविला दिल्लीत

या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित करताना खासदार वाघ यांनी सांगितले, की हा मुद्दा यापूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेतही उपस्थित करण्यात आला होता. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत स्वतंत्र आणि सखोल चौकशी समिती नेमणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रे त्यांच्या मूळ उद्दिष्टांनुसार कार्यरत राहणेही अत्यावश्यक आहे. कृषी विज्ञान केंद्र हे शेतकऱ्यांसाठी ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे केंद्र असावे. गैरव्यवहाराचे केंद्र नव्हे.

दरम्यान, या मुद्द्यावर केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून लवकरच उत्तर अपेक्षित असून, जळगाव जिल्ह्यातील शेतकरी वर्गात या प्रकरणामुळे नाराजीचे वातावरण असल्याचे समोर आले आहे. खासदार वाघ यांनी हा विषय संसदेत मांडल्यामुळे शेतकऱ्यांचा आवाज थेट दिल्लीपर्यंत पोहोचला असून, आता पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय



# जनगणना आणि राष्ट्रदिशा

भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशासाठी जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी नसून राष्ट्राच्या भविष्यास दिशा देणारी एक मूलभूत प्रक्रिया आहे. दर दहा वर्षांनी होणारी ही जनगणना विविध कारणांमुळे पुढे ढकलली गेली होती. मात्र, आता १ एप्रिल २०२६ पासून ती पुन्हा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर जनगणनेचे महत्त्व, तिचे परिणाम आणि तिच्या माध्यमातून घडू शकणारी राष्ट्रउभारणी यांचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते. जनगणना म्हणजे समाजाचे आरसेच होय. देशातील लोकसंख्या, स्त्री–पुरुष प्रमाण, शैक्षणिक स्तर, आर्थिक स्थिती, व्यवसाय, भाषिक रचना, धर्म, जातीय विभागणी, स्थलांतराची स्थिती अशा असंख्य बाबींचा वस्तुनिष्ठ आढावा या प्रक्रियेतून समोर येतो. कोणत्या प्रदेशात किती लोक राहतात, कोणत्या भागात कोणत्या सुविधा अपुऱ्या आहेत, कोणत्या घटकांना अधिक मदतीची गरज आहे, याचे स्पष्ट चित्र जनगणनेतून मिळते. त्यामुळेच शासनाच्या धोरणनिर्मितीचा हा पाया मानला जातो. मात्र या सर्व प्रक्रियेचा कणा म्हणजे माहितीची सत्यता. माहिती देणारा नागरिक आणि ती नोंदविणारा अधिकारी या दोघांचाही प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचा असतो. आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानामुळे माहिती संकलन आणि विश्लेषण अधिक अचूक व जलद झाले असले, तरी प्रारंभीच चुकीची माहिती दिली गेल्यास त्याचे परिणाम दूरगामी होऊ शकतात. त्यामुळे जनतेमध्ये जनगणनेचे महत्त्व पटवून देणे आणि सत्य माहिती देण्याबाबत जागरूकता निर्माण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. इतिहासातही जनगणनेतील आकडेवारीवरून सामाजिक आणि राजकीय समीकरणे बदलल्याची उदाहरणे दिली जातात. आरक्षण, संसाधनांचे वाटप, विकासाच्या योजना या सर्व गोष्टी मोठ्या प्रमाणावर जनगणनेवर अवलंबून असतात. त्यामुळेच या प्रक्रियेत कोणतीही ढिलाई किंवा हेतुपुरस्सर फेरफार होणे हे राष्ट्रहिताला बाधक ठरू शकते.

संगणकीकरणामुळे जनगणनेत अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर माहिती अल्पावधीत संकलित करणे, तिचे विश्लेषण करणे आणि विविध अहवाल तयार करणे सुलभ झाले आहे. नागरिकांना स्वतः माहिती भरण्याची सुविधा मिळाल्याने प्रक्रियेत पारदर्शकता वाढू शकते. मात्र त्याचबरोबर चुकीची किंवा अपूर्ण माहिती देण्याचा धोका देखील वाढतो. त्यामुळे तांत्रिक सुविधा आणि मानवी जबाबदारी यांचा योग्य समतोल साधणे आवश्यक आहे. या जनगणनेतून देशाच्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाचे व्यापक चित्र समोर येणार आहे. बेरोजगारी, शिक्षणाची पातळी, पायाभूत सुविधा, आरोग्य व्यवस्था, पाणी, वीज, स्वच्छता यांसारख्या मूलभूत गरजांची स्थिती स्पष्ट होईल. कोरोना महामारीनंतर झालेल्या स्थलांतराचा परिणाम, ग्रामीण–शहरी लोकसंख्येतील बदल, ऊर्जा वापराचे स्वरूप यांसारख्या अनेक बाबींचाही उलगडा होईल. ही माहिती शासनासाठी धोरणनिर्मितीचा मजबूत आधार ठरू शकते. जनगणनेच्या माध्यमातून देशातील कमकुवत घटक ओळखता येतात, तसेच विकासाच्या संधीही स्पष्ट होतात. योग्य नियोजन केल्यास शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा या क्षेत्रांत मोठे बदल घडविता येऊ शकतात. प्रत्येक घरात मूलभूत सुविधा पोहोचविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरते. तथापि, या प्रक्रियेचे काही धोकेही आहेत. जनगणनेतील माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

देशविरोधी शक्ती, अवैध कारवाया करणारे घटक किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील हितसंबंध यांच्याकडून या माहितीचा अपलाभ घेतला जाऊ शकतो. त्यामुळे माहितीचे संरक्षण आणि तिचा योग्य वापर याबाबत शासनाने अत्यंत सजग राहणे आवश्यक आहे. याचबरोबर जनगणनेतून मिळालेल्या माहितीचा वापर करून देशातील अवैध व्यवसाय, तस्करी, घुसखोरी, अतिक्रमणे यांसारख्या समस्यांवरही नियंत्रण ठेवता येऊ शकते. विविध विभागांमध्ये समन्वय साधून या माहितीचे विश्लेषण केल्यास अनेक लपलेल्या गोष्टी समोर येऊ शकतात. मात्र, यासाठी शासनाची ठाम इच्छाशक्ती आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. जनगणना ही केवळ आकडेवारीची मांडणी नसून राष्ट्रउभारणीचे प्रभावी साधन आहे. या प्रक्रियेतून देशाची बलस्थाने आणि कमकुवत बाजू दोन्ही स्पष्ट होतात. या माहितीच्या आधारे दीर्घकालीन नियोजन करून राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करता येतो. जर या संधीचा योग्य उपयोग केला, तर केवळ आर्थिक प्रगतीच नव्हे, तर सामाजिक समतोल आणि न्यायही साध्य होऊ शकतो. आजच्या काळात भारत महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी जनगणनेतून मिळणारी अचूक आणि व्यापक माहिती ही देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. शासनाने या माहितीचा योग्य वापर करून पारदर्शक, सक्षम आणि सर्वसमावेशक धोरणे आखली, तर राष्ट्रउभारणीला नवी गती मिळू शकते. शेवटी, जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सत्य, अचूक आणि प्रामाणिक माहिती देऊन नागरिकांनी या प्रक्रियेत सहभाग घेतला, तरच तिचे खरे उद्दिष्ट साध्य होईल. जनगणनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या संधीचा उपयोग करून भारताने अधिक सक्षम, समृद्ध आणि आदर्श राष्ट्रबनण्याची दिशा निश्चित करणे ही काळाची गरज आहे.

# कार्यकर्त्यांनो, आगामी जि. प., पं. स. निवडणुकांसाठी कामाला लागा

## माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांचे शिवसेना ग्रामीण कार्यकारिणीच्या बैठकीत आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लवकरच होतील. त्यामुळे कार्यकर्त्यांनी गाफील न राहता आतापासूनच कामाला लागावे. यात लोकांमध्ये जाऊन राज्यातील महायुती सरकारच्या योजना राबविण्यावर प्रामुख्याने भर द्यावा, असे आवाहन येथील माजी आमदार तथा शिवसेनेचे (एकनाथराव शिंदे गट) नेते शिरीषदादा चौधरी यांनी केले. शिवसेना ग्रामीण कार्यकारिणीची बैठक नुकतीच त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यात ते बोलत होते.



*अमळनेर : शिवसेना ग्रामीण कार्यकारिणीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत बोलताना माजी आमदार शिरीषदादा चौधरी.*

बैठकीच्या प्रारंभी कार्यकारिणीतील सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शिरीषदादा चौधरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये तालुकाप्रमुख गुलाब पाटील, उपजिल्हाप्रमुख प्रथमेश पवार, विधानसभा क्षेत्रप्रमुख सुरेश पाटील, शहरप्रमुख विकास कंखरे यांचा समावेश होता. बैठकीदरम्यान शिवसेनेच्या ग्रामीण कार्यकारिणी विस्तारासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. जुन्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान राखत नव्या पदाधिकाऱ्यांना सामावून घेऊन लवकरच शिवसेना तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख गुलाब पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख सुरेश पाटील यांनी मनोगतात शिरीषदादा चौधरी यांच्या नेतृत्वामुळे अमळनेरमधील शिवसेनेला नवे बळ मिळाल्याची भावना व्यक्त केली.

शिरीषदादा चौधरी म्हणाले, की नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी 'गाव तेथे शाखा आणि प्रभाग तेथे शाखा' हा उपक्रम राबवून प्रत्येक शिवसैनिकाला बळ द्यावे. तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आपण स्वबळावर लढविणार असल्याने कार्यकर्त्यांना कामाला लावावे. तसेच शेतकरी, कष्टकरी यांच्यावरील अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहावे, गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणे, लोकसंपर्क वाढविणे तसेच सदस्य नोंदणी व विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून संघटन बळकट करावे. भविष्यात क्रियाशील शिवसैनिकांना उमेदवारी देण्यासह पदांच्या माध्यमातून वेगळी जबाबदारी देण्यात येईल. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे अपघाती निधन तसेच हिरा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा स्व. काकासाहेब हिरालाल चौधरी यांचे निधन झाल्यामुळे येत्या ४ एप्रिल २०२६ रोजी माझा वाढदिवस कोणीही साजरा करू नये. तसेच या दिवशी कुणीही बॅनर, जाहिरात, बुके, भेटवस्तू इत्यादी देऊ नये.

बैठकीस किरण गोसावी (नगाव बुद्रुक), एन. आर. ठाकरे (वावडे), शशिकांत पाटील, रवी पाटील (धार), जितू बापू, रावसाहेब कोळी, उत्तम वानखेडे (मांडळ), सुदाम चौधरी (शिरसाळे), पुरुषोत्तम चौधरी, संतोष चौधरी (पिंपळे), राजेंद्र पाटील (गळवाडे), चिंधा पाटील (एकलहरे), गजेंद्र जाधव (रामेश्वर), रामचंद्र पाटील (मुडी), जितेंद्र पाटील (आर्डी), परशुराम पाटील (कचरे), भूषण चौधरी (अमळगाव), भूषण पाटील, भरत पाटील (म्हसले), अविनाश पवार (पिळोदे), मयूर चौधरी (कळमसरे), भूषण कोळी (हिंगोणे खुर्द प्र. ज.), प्रताप पारधी (आमोदे), दामोदर पाटील (नंदगाव), रोशन सोनवणे (दहिवद) यांच्यासह अनेक गावांतील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजचे अभीष्टचिंतन





**सौ. कांचन शहा**
अध्यक्षा : महिला मंच ट्रस्ट



**श्री. नंदकुमार वाघ**
अमळनेर

# जयघोषाने दुमदुमलेल्या चैत्र नवरात्रोत्सवाची सांगता

## आदिमायेच्या सप्तश्रृंग गडावर ओसंडला भक्तीचा महासागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर महाराष्ट्राची कुलदेवता आदिमाया सप्तश्रृंगी देवीच्या चैत्रोत्सवाची गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ ला भक्तिमय वातावरणात सांगता झाली. पौर्णिमा व हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर गुरुवारी सकाळपर्यंत दोन लाखांहून अधिक भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. यंदाच्या संपूर्ण चैत्र नवरात्रोत्सव काळात सुमारे १२ लाख भाविकांनी गडावर हजेरी लावल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.


यंदा सप्तश्रृंगीदेवी ट्रस्ट, ग्रामपंचायत, रोपवे प्रशासन व विविध प्रशासकीय यंत्रणांच्या समन्वयातून उत्सव शांततेत आणि यशस्वीरीत्या पार पडला. काही किरकोळ उणिवा राहिल्या असल्या, तरी एकूणच व्यवस्थापन सुरळीत झाल्याने प्रशासनासह भाविकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. यात्रोत्सव काळात अवकाळी पाऊस, शेतमालाला कमी भाव व इतर अडचणी असूनही गडावर कोट्यवधींची उलाढाल झाली. गडाच्या मार्गावरील गावे, आदिवासी बांधव व स्थानिक व्यापाऱ्यांना या यात्रेचा मोठा आर्थिक आधार मिळाला. उत्सव संपत आला असला तरी आजही गडावर भाविकांचा ओघ कायम होता. दर्शनासाठी राम टप्प्यापर्यंत रांगा लागल्या होत्या.



वाढत्या गर्दीमुळे पाच मिनिटांच्या अंतराने बससेवा सुरू ठेवण्यात आली. न्यासाच्या महाप्रसादालयात दिवसभरात सुमारे २० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पायी वारीने सुमारे दहा लाखांहून अधिक भाविक गडावर दाखल झाले. विविध संस्था, संघटना व दानशूर व्यक्तींनी चहा, पाणी, औषधे, नाश्ता व भोजनाची व्यवस्था करून सेवा कार्यात सहभाग घेतला. प्लास्टिक बंदीमुळे कचऱ्याचे प्रमाण काहीसे कमी झाले, तर पाण्याच्या टँकरमुळे पाणीटंचाई भासली नाही. नाशिकच्या अनिरुद्ध अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे २०० स्वयंसेवक विविध ठिकाणी कार्यरत होते. महसूल, आरोग्य, पोलीस, परिवहन आदी विभागांनीही उत्कृष्ट समन्वय साधत सेवा बजावली. जिल्हा प्रशासन, न्यास, स्थानिक पदाधिकारी व स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळे हा चैत्रोत्सव यशस्वी ठरला.

### १२ लाख भाविकांची उपस्थिती

यंदा चैत्र नवरात्रोत्सवादरम्यान सप्तश्रृंग गडावर जवळपास १२ लाख भाविकांनी उपस्थिती दिली. पौर्णिमा व हनुमानजींच्या जन्मोत्सवाला दोन लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले. प्रशासन, ट्रस्ट व स्वयंसेवकांच्या समन्वयातून उत्सव शांततेत पार पडला. पाणी, आरोग्य व महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. स्थानिकांना यामुळे आर्थिक आधार मिळाल्याने यात्रोत्सवातील चमक वाढल्याचे दिसून आले.



# उथळ पाण्यात वावरणारा पक्षी

**पक्ष्यांची ओळख**

**नाव :** शेकाट्या Stilt
**पाय :** शेकाट्याचे पाय लांब, बारीक व गुलाबी रंगाचे असतात.
**रंग :** पांढरा, पंख काळे, पाय गुलाबी
**चोच :** निमुळती, लांब, बारीक, काळी
**डोळे :** तेजस्वी, लाल रंगाचे. डोळ्याभोवती पांढरी छटा, दृष्टी तीक्ष्ण
**घरटे :** हा पक्षी उथळ नदीजवळ, तलावाकाठी, जमिनीवर झुडपांमध्ये काड्या व गवताचे घरटे बांधतो.
**अंडी :** उन्हाळा सुरू झाला की मादी विणीच्या हंगामात तीन–चार अंडी घालते. अंड्यावर तपकिरी ठिपके असतात. माती, चिखल या रंगाशी ते एकरूप होतात.
**भक्ष :** हा पक्षी उथळ पाण्यातील लहान मासे, खेकडे खातो. जलचर प्राणी हे त्याचे अन्न होय. त्यासाठी लांब चोचीचा उपयोग होतो.
**आवाज :** शेकाटे थव्यात राहून चेक चेक चेक आवाज करतात. हा आवाज बारीक पण उच्च स्वरात पिंगाणीसारखा वाटतो.
**इतर वैशिष्ट्ये :** शेकाट्या हे स्थलांतरीत पक्षी आहेत. हे पक्षी हिमालयातून, युरोपमधून उबदार भारतात येतात. देशभर पसरतात. चार महिने पाणथळस्थळी राहतात व परत आपल्या मूळ जागी जातात. त्याचे उंच लाल पाय लक्ष वेधून घेतात. स्थलांतरीत असला तरी भारतभर आढळतो. ऑक्टोबरमध्ये अमळनेरात बोरी नदीकाठी, निसर्डी धरण, भोकरबारी धरण, धार पाझर तलाव, तापीकाठ, अनेर धरण येथे शेकाट्यांचे थवे दिसतात. पक्षी निरीक्षकांनी, विद्यार्थ्यांनी या थव्यांचे निरीक्षण जरूर करावे.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्रमंडळ, अमळनेर.**

# दुपारच्या जेवणानंतरची सुस्ती कशी घालवाल ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुपारच्या जेवणानंतर येणारी सुस्ती अर्थात 'फूड कोमा' घालविण्याचे मुख्यत्वे ८ प्रभावी उपाय आहेत. त्यामुळे सुस्ती सहजपणे घालविली जाते.

**१) कार्बोहायड्रेट्सवर नियंत्रण :** दुपारी अतिप्रमाणात भात किंवा साखरयुक्त पदार्थ खाल्ल्याने रक्तातील इन्सुलिन वाढते आणि झोप येते. त्यामुळे प्रथिनांचा समावेश वाढवा.

**२) पाण्याचे प्रमाण :** शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे थकवा जाणवत असल्याने जेवणानंतर पुरेसे पाणी प्यावे. जेणेकरून ऊर्जा टिकून राहते.

३) शंभर पावले चाला : जेवणानंतर लगेच बसून न राहता किमान १० ते १५ मिनिटे संथगतीने चालावे. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि पचन सुलभ होते.

**४) न्याहारीवर लक्ष :** सकाळी भरपेट नाश्ता केल्यास दुपारी खूप भूक लागत नाही. पर्यायाने जड जेवण टाळले जाते आणि सुस्ती कमी येते.

**५) सूर्यप्रकाश घ्या :** जेवणानंतर काही वेळ नैसर्गिक उजेडात घालवल्यास शरीरातील 'मेलाटोनिन' (झोपेचे संप्रेरक) कमी होऊन सतर्कता वाढते.

**६) लहान डुलकी :** जर झोप अनावर होत असेल, तर फक्त १५ ते २० मिनिटांची छोटी डुलकी घ्या; जास्त वेळ झोपल्यास रात्रीची झोप बिघडू शकते.

**७) हर्बल टी किंवा कॉफी :** जेवणानंतर अर्ध्या तासाने कोमट पाणी किंवा ग्रीन टी घेतल्यास चयापचय क्रिया वेगवान होते.

**८) सावधानतेने बसा :** कामाच्या ठिकाणी बसताना पाठीचा कणा ताठ ठेवावा; चुकीच्या पद्धतीने बसल्याने शरीराला अधिक थकवा जाणवतो.

**जाणकारांचा सल्ला**

ही झोप नैसर्गिक असली, तरी जर ती दररोज आणि अतिप्रमाणात येत असेल, तर रक्तातील साखरेची तपासणी करणे आवश्यक आहे.

# भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरींना पितृशोक

## आदर्श शिक्षक डी. सी. चौधरी यांचे ८३ व्या वर्षी निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय जनता पक्षाचे जळगाव जिल्हाध्यक्ष आणि जळगावातील सृष्टी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राधेश्याम चौधरी (वय ८३) यांचे वडील धर्मराज चंपालाल चौधरी (डी. सी. चौधरी) यांचे गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता निधन झाले. स्व. डी. सी. चौधरी हे एक आदर्श शिक्षक म्हणून परिचित



होते. त्यांनी भाटपुरा (ता. शिरपूर, जि. धुळे) येथील हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा बजावली होती. त्यांच्या निधनाने शिक्षण तसेच सामाजिक वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्यामागे जळगावचे डॉ. राधेश्याम चौधरी, भाटपुऱ्याचे माजी सरपंच शैलेंद्र चौधरी आणि चोपडा येथील सृष्टी सीड्स व फर्टिलायझर्सचे संचालक नितीन चौधरी ही तीन मुले आणि सुना, नातवंडे असा परिवार आहे. स्व. डी. सी. चौधरी यांच्यावर आज शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता भाटपुरा (जि. धुळे) येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी जिल्ह्यातील राजकीय, वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी चौधरी कुटुंबीयांचे सांत्वन करत श्रद्धांजली अर्पण केली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




# खरेखुरे क्रियाशील सुधारक: महर्षी धोंडो केशव कर्वे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

व्यासपीठावर बसलेले डॉ. राजेंद्रप्रसाद यांची नजर रांगेतील एका खुर्चीकडे वारंवार जात होती. 'चटकन उठावं, व्यासपीठाच्या पायऱ्या उतरून पहिल्या रांगेतील त्या खुर्चीपर्यंत जावे, त्या खुर्चीवर बसलेल्या 'त्या तपस्वी महर्षीला वाकून वंदन करावे' असे त्यांच्या मनात पुनःपुन्हा येत होते. पण हे करण्यासाठी नेमका कोणता क्षण पकडावा, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. त्या समारंभात कुठलाही व्यत्यय न येता राष्ट्रपतीपदाची प्रतिष्ठा सांभाळून त्यांना हे सारे करायचे होते. समारंभ होता पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात. महाविद्यालयाने ७५ वर्षांची वाटचाल पूर्ण केल्याबद्दल एक मोठा समारंभ आयोजित केला होता, त्यासाठी भारताचे राष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. राजेंद्रप्रसाद भाषणासाठी उठले. पण ते जेव्हा माईककडे न जाता, व्यासपीठाच्या पायऱ्या उतरू लागले तेव्हा मात्र सारेच बुचकळ्यात पडले. राष्ट्रपती खाली उतरले. चालत-चालत पहिल्या रांगेतील त्या विशिष्ट खुर्चीपर्यंत गेले आणि तेथे बसलेल्या त्या वयोवृद्ध व्यक्तीला वाकून नमस्कार केला त्यांनी. 'ती व्यक्ती कोण आहे,' हे तेथे हजर असलेल्या प्रत्येकाला माहीत असल्याने, तमाम पुणेकर जनतेने राष्ट्रपतींच्या या कृतीला पुन्हा एकदा प्रचंड टाळ्यांचा गजर करून मनमुराद दाद दिली. कारण ती व्यक्ती म्हणजे दुसरे-तिसरे कुणीही नव्हते तर साक्षात अण्णा होते. अण्णा म्हणजेच ' महर्षी धोंडो केशव कर्वे'.



खरेखुरे क्रियाशील सुधारक. महर्षी कर्वे म्हणजे सेवामूर्ती. वयाची सत्तरी ओलांडल्यानंतर हा आधुनिक व्यास आपल्या शिक्षण संस्थांना देणग्या मिळविण्यासाठी इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान या देशाच्या दौऱ्यावर निघाला होता आगबोटीच्या खडतर प्रवासाने. हे पाहिले की त्यांचे शिक्षण-प्रेम आणि सामाजिक सुधारणांबद्दलची त्यांची तळमळ लक्षात येते. खरेतर महर्षी कर्वे केवळ 'वाचाळवीर' नव्हते तर ते 'कर्मवीर' होते.

'आधी केले मग सांगितले' या न्यायाने त्यांनी आधी एका विधवेशी विवाह केला आणि मगच समाजाचा प्रचंड विरोध पत्करूनही विधवा विवाहासाठी विचार जागृतीचे अभियान चालू केले. महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या महर्षीने पित्याच्या वात्सल्याने आपल्या प्रत्येक शिक्षण संस्थेचे भरण-पोषण केले होते.

फर्ग्युसन कॉलेजात लोकमान्य टिळक गणिताचे अध्यापन करीत असत. चळवळींमुळे त्यांना फर्ग्युसन कॉलेजमधून बाजूला व्हावे लागले, तेव्हा ती जागा महर्षी कर्वेंना मिळाली. टिळकांचा वारस म्हणून कर्वे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सलग २३ वर्षे गणिताचे अध्यापन केले. पुण्यातल्या एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे ते संकल्पक, संस्थापक, संघटक होते. आपल्या शिक्षण संस्थांवर अण्णांची किती प्रचंड माया होती आणि त्या संस्थांच्या उभारणी साठी केवढी धडपड करीत होते ते पुढील प्रसंगावरून लक्षात येते.

सुप्रसिद्ध उद्योगपती सर विठ्ठलदास ठाकरसी यांना भेटून 'काही देणगी मिळतेय का' हे पाहण्यासाठी महर्षी एकदा त्यांच्या पुण्यातल्या बंगल्यावर गेले होते. पायी चालत. पर्वतीच्या बाजूला त्यांचा बंगला. पण त्या काळात १०-१५ किलोमीटर चालण्याचे कर्वे यांना काहीच वाटत नसे. अगदी एक रुपया जरी देणगी मिळणार असेल, तर अण्णा ५-६ मैल जाऊन तो रुपया घ्यायला तयार असत.

**संस्था उभ्या राहतात, त्या अशा भगीरथांमुळे**

ठाकरसींना अण्णा भेटले, चर्चा झाली. ठाकरसींनी सुरुवातीला एक लाख देण्याचे आश्वासन तर दिलेच, पण पुढे अधिकाधिक देणगी देण्याचा संकल्पही व्यक्त केला. अण्णांना खूप बरे वाटले. खूश होऊन ते परत निघाले. ठाकरसी म्हणाले, की 'कसे जाणार परत घरी', 'चालत', अण्णा म्हणाले. 'म्हणजे? आलात कसे अण्णा?' ठाकरसींना विचारले, 'कसे म्हणजे? चालतच आलोय मी?' अण्णांचे हे उत्तर ऐकून ठाकरसी अवाकच झाले. सात-आठ मैल चालत आलेले अण्णा पुन्हा सात-आठ मैल, भरउन्हात चालत जाणार होते. 'नाही नाही अण्णा, तुम्ही चालत जाऊ नका, हे दोन रुपये घ्या आणि टांग्याने घरी जा.' ठाकरसींनी बजावले. 'बर! बर!' असे म्हणून अण्णा उठले आणि बाहेर पडले. पण ठाकरसींना चैन पडेना. 'एकेका रूपयासाठी धडपडणारे अण्णा टांग्यासाठी दिलेले दोन रूपये सुद्धा संस्थेच्या मदत निधीत भरतील आणि स्वतः चालत जातील,' असे त्यांना राहून राहून वाटत होते. म्हणूनच त्यांनी ड्रायव्हरला बोलावले आपल्या आणि त्याला सांगितले, की 'पटकन जा, आता जे गृहस्थ आपल्या बंगलयातून बाहेर पडलेत, ते टांग्याने जात असतील तर परत ये. पण जर ते चालत जाताना दिसले, तर त्यांना आपल्या गाडीतून एरंडवण्याला सोडून ये.' ड्रायव्हरने लगबगीने गाडी काढली, रस्त्यावर आणली. थोडेसे अंतर जातो न जातो, तोच त्याला दिसले, अण्णांची कृश मूर्ती रस्त्यावरून सावकाश चालत एरंडवण्याकडे निघाली होती. मला सांगा, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद अशा ऋषितुल्य व्यक्तीला खुर्चीवरून उठून व्यासपीठ सोडून नमस्कार करायला आले तर त्यात नवल ते कसले. त्यावेळी महर्षी कर्वे याचे वय होते १०१ वर्षे. नुकताच त्यांना 'भारतरत्न' पुरस्कार मिळाला होता. बर्लिनमध्ये साक्षात आईनस्टाईनला भेटणारा हा पहिला महाराष्ट्रीयन महापुरुष. **दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना मानाचा मुजरा.**

# समाजभान जपणारे अभिनेते निळू फुले



**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांचा जन्मदिन हा केवळ एका कलाकाराची आठवण करून देणारा दिवस नाही, तर तो समाजप्रबोधनाची जाणीव करून देणारा एक महत्त्वाचा क्षण आहे. आपल्या प्रभावी अभिनयातून आणि ठसठशीत भूमिकांमधून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अमिट छाप सोडली.

### प्रारंभिक जीवन

निळू फुले यांचा जन्म ४ एप्रिल १९३० रोजी पुण्यात झाला. साध्या कुटुंबात जन्मलेल्या या कलाकाराने आपल्या मेहनतीच्या जोरावर अभिनय क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली. सुरुवातीला ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि नंतर राष्ट्र सेवा दल या संस्थांशी जोडले गेले. याच काळात त्यांच्यातील सामाजिक जाणीव अधिक तीव्र झाली.

### रंगभूमीपासून चित्रपटसृष्टीपर्यंत

निळू फुले यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरूवात रंगभूमीपासून केली. त्यांच्या नाटकांमधील भूमिका वास्तववादी आणि प्रभावी असायच्या. पुढे त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. त्यांनी साकारलेले खलनायकाचे पात्र हे केवळ नकारात्मक नव्हते, तर त्यामागे समाजातील अन्याय, विषमता आणि सत्तेचा गैरवापर यांचे प्रतिबिंब दिसत असे. त्यांच्या अभिनयामुळे खलनायकालाही एक वेगळी उंची प्राप्त झाली.

### गाजलेल्या भूमिका

निळू फुले यांनी अनेक चित्रपटांमध्ये लक्षवेधी भूमिका केल्या. त्यात 'सिंहासन', 'सामना', 'जैत रे जैत', 'एक गाव बारा भानगडी' या चित्रपटांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्यांच्या आवाजातील करारीपणा, डोळ्यांतील धार आणि संवादफेक यामुळे त्यांनी प्रत्येक भूमिका जीवंत केली.

### समाजकार्याची बांधिलकी

निळू फुले हे केवळ अभिनेते नव्हते, तर ते एक जाणीवसंपन्न समाजसेवकही होते. त्यांनी आपले जीवन सामाजिक कार्यासाठी अर्पण केले. गरीब, शेतकरी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर ते नेहमीच आवाज उठवत. त्यांच्या विचारांमध्ये डाव्या चळवळीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

### व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये

साधेपणा आणि प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी, वास्तववादी अभिनय, स्पष्टवक्तेपणा या गुणांमुळे ते केवळ कलाकार म्हणून नव्हे, तर एक विचारवंत म्हणूनही ओळखले जातात. आजच्या पिढीने निळू फुले यांच्याकडून केवळ अभिनयच नव्हे, तर समाजाबद्दलची संवेदनशीलता आणि जबाबदारी शिकण्याची गरज आहे. त्यांचा जन्मदिन साजरा करताना त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. **दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन!**

## उन्हाळ्यात सब्जाचे पाणी गुणकारी!

### प्यायल्याने मिळतील 'हे' आरोग्यदायी फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**शरीराला थंडावा :** सब्जाचे पाणी उन्हाळ्यात शरीराचे तापमान कमी करून उष्माघातापासून संरक्षण करते.

**पचन सुधारते :** हे पाणी ॲसिडिटी, गॅस आणि बद्धकोष्ठता कमी करून पचनक्रिया सुधारते.

**वजन कमी करण्यास मदत :** सब्जा बिया पोटभर ठेवतात. त्यामुळे भूक कमी होते आणि वजन नियंत्रणात राहते.

**हायड्रेशन वाढवते :** डिहायड्रेशन टाळून शरीराला आवश्यक पाणी पुरवते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** त्वचेला नैसर्गिक ग्लो देऊन स्किन हेल्दी आणि फ्रेश ठेवते.

**एनर्जी वाढवते :** थकवा कमी करून शरीराला ताजेतवाने ठेवते.

**डिटॉक्स ड्रिंक :** शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढून शरीर शुद्ध ठेवण्यास मदत करते.

# एलआयसी एजंटने उभारले कोट्यवधींचे साम्राज्य

## नोकरीतून निवृत्तीनंतर सुरू केला व्यवसाय; भारतातील सर्वांत ज्येष्ठ व्यावसायिक

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोनालिका ग्रुपचे संस्थापक लक्ष्मण दास मित्तल नोकरीतून निवृत्त झाल्यावर त्यांनी वयाच्या ६६ व्या वर्षी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आणि आता कोट्यवधी रुपयांचे साम्राज्य उभे केले आहे.


१९९० मध्ये एलआयसीतून निवृत्त झाल्यानंतर लक्ष्मण दास मित्तल यांनी व्यवसायाची निवड केली. त्यावेळी एका निवृत्त अधिकाऱ्याने भारतातील तिसऱ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या ट्रॅक्टर उत्पादकाचा पाया घालेल याची कोणी कल्पनाही केली नसेल. मित्तल यांनी आपल्या अनुभव, दूरदृष्टी आणि कठोर परिश्रमातून सोनालिका ग्रुपला जागतिक ओळख मिळवून दिली. आज, सोनालिका ग्रुपची प्रमुख कंपनी, इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स, बाजारपेठेतील हिश्श्याच्या बाबतीत भारतात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जपानी दिग्गज यानमारची कंपनीमध्ये ३० टक्के हिस्सेदारी आहे, जे भारतीय कृषी यंत्रसामग्री क्षेत्रात सोनालिकाच्या मजबूत विश्वासार्हतेचे द्योतक आहे.

### लक्ष्मण दास मित्तल कोण?

लक्ष्मण दास मित्तल हे पंजाबमधील होशियारपूरचे रहिवासी आहेत. त्यांचा जन्म १९३१ मध्ये झाला. १९५५ मध्ये त्यांनी एलआयसी एजंट म्हणून काम करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून मित्तल यांनी आपल्या पगारातून बचत करण्यास सुरूवात केली. त्यांनी १९९० पर्यंत काम करणे सुरू ठेवले. वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते सहा वर्षे घरी राहिले. त्यानंतर लक्ष्मण मित्तल यांनी वयाच्या ६६ व्या वर्षी स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतिहास रचला.

१९९६ मध्ये मित्तल यांनी आघाडीच्या ट्रॅक्टर ब्रँडपैकी एक असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सची सुरूवात केली आणि ते भारतातील सर्वात वयस्कर व्यावसायिक बनले. लक्ष्मण दास मित्तल यांना प्रतिष्ठित उद्योगरत्न पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

सोनालिका या नावाचा हिंदीमध्ये अर्थ 'सोन्याच्या रेषा' असा होतो. भारताच्या हरित क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेल्या गव्हाच्या वाणावरून हे नाव प्रेरित आहे. हे नाव स्वतःच मित्तल यांची दूरदृष्टी दर्शवते, जे शेतकऱ्यांची समृद्धी आणि कृषीच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीचे प्रतीक आहे.



लक्ष्मण मित्तल यांचा ट्रॅक्टर ब्रँड जगभर पसरला आहे. सोनालिका हा भारतातील तिसरा सर्वात मोठा ट्रॅक्टर ब्रँड आहे. कंपनीचे दोन लाखांहून अधिक आंतरराष्ट्रीय ग्राहक आहेत. कंपनीचा विस्तार १४० देशांमध्ये आहे. फोर्ब्सच्या अब्जाधीशांच्या यादीत त्यांचा समावेश आहे. त्यांची एकूण संपत्ती अंदाजे २.५ अब्ज डॉलर्स आहे. आज सोनालिका ग्रुपची एकूण संपत्ती अंदाजे २१ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

# टीपू सुल्तान को युद्ध में परास्त करने वाले सूबेदार तुकोजीराव होलकर इतिहास के पन्नों से गुम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### शासन अविधि (१७९५-१७९७)

तुकोजीराव होलकर हमेशा अपने काका सूबेदार मल्हार राव होलकर के साथ युद्ध क्षेत्रों में सहायक रहे थे। मल्हार राव होलकर की मृत्यु के पश्चात मातेश्वरी अहिल्याबाई ने उनको अपना सेनापति बनाया था। वह मातोश्री अहिल्याबाई होल्कर व पेशवा के हमेशा विश्वस्त स्वामी भक्त बने रहे। इनका जन्म सन् १७२३ में हुआ था। मातोश्री के शासनकाल में उन्होंने कई युद्धों में भाग लिया था। सन १७९४ में महादजी सिंधिया की मृत्यु के बाद सूबेदार तुकोजीराव होलकर ही मराठों के प्रमुख थे ।

मातोश्री के देवलोक गमन के पश्चात इंदौर राज्य प्रभार के सारे अधिकार सूबेदार तुकोजीराव को हस्तगत हुए। उनके कार्यकाल में राज्य की दशा पूर्ण संतोषजनक रही। सुभेदार तुकोजी राव होलकर एक कुशल सेनापति और वीर योद्धा थे व साधारण रहन-सहन वाले निर्भय मानी व्यक्ति थे। पेशवा द्वारा उनको १२ भाई वाली सलाहकार समिति में भी स्थान देकर मान दिया गया था।

### सन १७८५ में टीपू सुल्तान पर चढ़ाई।

टीपू सुल्तान ने अपने शासनकाल में एक लाख से अधिक हिंदुओं को मुसलमान बनाया था। वह अपने आप को औरंगजेब, तैमूर, नादिरशाह, की तरह मशहूर करना चाहता था और उनका सरताज बनना चाहता था। जिस समय हिंदुओं को बलपूर्वक मुसलमान बनाने का कार्य शुरू हुआ। उसी समय हिंदू समाज में कोहराम और आहकार को सुनकर हिंदू धर्म की रक्षा का बाना धारण करने वाले मराठों में क्रोध की लहर दौड़ पड़ी तथा सभी ने यह निश्चय किया कि टीपू सुल्तान के फन को कुचला जाए। नाना फडणवीस ने सभी मराठा सरदारों को आदेश दिया कि वह धर्मार्थ टीपू सुल्तान पर चढ़ाई करे। पुणे में सभी मराठा सरदारों की विशेष सभा में यह निश्चय किया गया कि धर्मांध टीपू सुल्तान पर चढ़ाई करने के लिए पहले परशुरामभाऊ को भेजा गया और फिर मार्च १७८६ में तुकोजी राव होल्कर ने टीपू सुल्तान के विरुद्ध प्रयाण किया। वह पश्चिमी रास्ते से होकर बादामी की ओर आगे बढ़ेंगे। उन्होंने मई १७८६ को



बादामी किले को घेरकर ३ सप्ताह तक भयंकर गोलीबारी की और घमासान युद्ध कर। उस पर अधिकार कर लिया। इसी प्रकार ८ जून १७८६ को तुकोजी राव होल्कर ने गजेंद्रगढ़ पर अधिकार कर लिया। जल्द ही मराठों ने धारवाड़, सावनुर, अडोनी, गजेंद्रगढ़ तथा बहादुर विंडा युद्ध कर अधिकार कर लिया। युद्ध के बाद टीपू सुल्तान सावानूर की ओर आगे बढ़ा। यहां का राजा मराठों का मित्र था। इसलिए तुरंत हरिपंत और तुकोजीराव होलकर सावनुर की रक्षा के लिए पहुंच गए । यहां पर मराठों ने छापामार प्रणाली के द्वारा टीपू सुल्तान से युद्ध किया तथा। उसे बहुत हानि पहुंचाई उस युद्ध में खुलकर तोपखाने का प्रयोग किया गया। मराठों ने गुरिल्ला युद्ध द्वारा टीपू सुल्तान के हजारों सैनिकों को मार डाला। टीपू सुल्तान केवल देखता रह गया। अब उसे यह आभास हो गया था कि वह मराठों से जित ना सकेगा। इसलिए उसने मराठा सरदार हरि पंथ से संधि वार्ता शुरू की यह उसकी चाल मात्र थी। हरि पंत के थोड़ा ढीला पढ़ते ही वह उन पर टूट पड़ा। तब पंत ने मुश्किल से अपनी रक्षा की। उसके बाद एक दिन तुकोजीराव होलकर और पंत ने टीपू सुल्तान पर आक्रमण कर मारकाट मचा दी। इसमें मराठों ने बड़ी संख्या में टीपू सुल्तान के सैनिकों को काट कर फेंक दिया। टीपू सुल्तान की सेना मराठों की मार सहन नहीं कर सकी की और रणभूमि में भागने लगी। टीपू की सेना जब मैदान से भागी तो उनके पीछे मराठा गुड़सवार लग गए। उन्होंने टीपू की सेना का भारी विनाश किया टीपू सुल्तान भी पराजित होकर भागा। उसका पीछा किया तथा उसके ढेरों को लूट कर आग लगा दी और उसके बहुत से सैनिकों को कैद कर लिया। टीपू सुल्तान की हार इतनी करारी थी कि वह मोशिलेविय के पास जाकर रुका। उसने वहां से संधि की याचना की वीर तुकोजीराव होलकर के अधिनायकत्तव मैं मराठा रण वाहिनी टीपू सुल्तान को महाराष्ट्र मंडल के साथ संधि पर विवश होना पड़ा। अंत में मार्च १७८६ को गजेंद्रगढ़ में टीपू और मराठों में संधि हुई संधि के अनुसार टीपू सुल्तान ने पेतालिस लाख नगद और सहाठ लाख देने का वादा किया, इस संधि से मराठों को अधिक लाभ हुआ उनके खोए इलाके फिर से उन्हें वापस मिल गए और मराठों की सीमा कृष्णा नदी के बजाय तुंगभद्रा नदी तक पहुंच गई। तुकोजी राव होल्कर ने टीपू के दो पुत्रों को अपनी कैद में रखा। जब तक टीपू संधि के अनुसार सारे कार्य नहीं करता तब तक उसके दोनों पुत्रों को कैद में ही रखा जाएगा। तुकोजीराव होलकर ने अपनी पैनी तलवार की मार से टीपू सुल्तान का धर्मांधता का भूत उतार दिया। आगे चलकर टीपू के सारे राज्य को मराठों और अंग्रेजों ने जीत लिया। जिस मैसूर के हिंदू राजघराने को हराकर टीपू ने गद्दी छीनी थी उन्हीं मेंसुर के राजा को वापस सौंप दिया गया। त्रावणकोर के इलाके को टीपू ने जीता था। उसके राजा को त्रावणकोर वापिस दे दिया गया। टीपू की सत्ता का अंत हो गया।

ऐसे मराठा वीर योद्धा सूबेदार तुकोजीराव होलकर को शत शत नमन।

**शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.**

**सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी**



**एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम**

**सीमा हॅण्डलूम हॉउस** पारोळा रोड, धुळे




# भीमरूपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती।

## हनुमान भक्तीमधील अनोखी परंपरा जाणून घ्या.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रामभक्त हनुमानजी यांची पूजा म्हणजे केवळ एक विधी नाही, तर भक्ती, प्रेम आणि समर्पणाचा सुंदर संगम आहे. त्यांना अर्पण केली जाणारी प्रत्येक वस्तू मग ती बुंदी असो वा तेल या सर्वांमध्ये गूढ अर्थ दडलेला आहे. या सर्व परंपरा भक्तांच्या श्रद्धेला अधिक दृढ करतात आणि जीवनात भक्ती, धैर्य आणि सकारात्मकतेची ऊर्जा निर्माण करतात. या खास कारणांमुळे बजरंगबली हनुमान यांना बुंदी, तेल, रुईची पाने आणि शेंदूर वाहिला जातो.

### हनुमानजींना बुंदीचा नैवेद्य का दाखवितात?

कोणत्याही भगवंताला नैवेद्य दाखवताना तो प्रामुख्याने दूध किंवा खवा यापासून तयार केलेला असतो, पण बजरंबली हनुमान यांना मात्र बुंदीचा नैवेद्य अधिक प्रिय आहे. याबद्दल असे सांगितले जाते की, बजरंगबली हनुमान यांच जन्म मंगळवारी झाला, त्या दिवशी त्यांची विशेष पूजा केली जाते. त्यामुळे दुधापासून तयार झालेली मिठाई हनुमानजींना अर्पण केली जात नाही. दूध हे चंद्राचे प्रतीक मानले जाते. तसेच चंद्र आणि मंगळ यांचे परस्पर मैत्रीपूर्ण संबंध नाहीत. त्यामुळे हनुमानजींना गोड बुंदी अर्पण केली जाते, जी त्यांना अतिशय प्रिय मानली जाते. बजरंगबलींना बुंदी किंवा बुंदीचे लाडू अर्पण केल्याने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असे मानले जाते.

हनुमानजींना तेल का अर्पण केले जाते?

दर शनिवारी हनुमानजींच्या मस्तकावर तेल घातले जाते. यासंदर्भात एक कथा आहे. रामायणात इंद्रजिताने सोडलेल्या संहारक शस्त्रामुळे लक्ष्मण मूर्च्छित होऊन पडला होता. त्यावर उपचार करण्यासाठी बजरंबली हनुमान यांनी संजीवनी वनस्पती असलेला द्रोणागिरी पर्वत समूळ उपटून ते लंकेकडे ते रवाना होत होते. हनुमानजी आकाशमार्गे लंकेकडे जात असता गैरसमजुतीने भरताने त्यांच्यावर बाण सोडला आणि ते खाली पडले पण त्याचवेळी हनुमानजींचे कार्य आणि कर्तृत्व कळताच भरताने त्याच्या जखमेवर तेल आणि शेंदूर लावला. त्यामुळे जखम तत्काळ बरी होऊन हनुमान वेळेवर लंकेत पोहोचले. यातूनच प्रेरणा घेत हनुमानजींना तेल अर्पण करण्याची प्रथा रुढ झाली.

### हनुमानजींना चमेलीचे तेल प्रिय का?

चमेलीचे तेल हनुमानजींना खास प्रिय आहे. चमेलीला पारशी भाषेत 'यासमीन' म्हणतात आणि त्याचा अर्थ 'ईश्वराची देणगी' असा होतो. जेव्हा हे फूलच ईश्वराची देणगी मानले जाते, तेव्हा त्यापासून तयार होणारे प्रत्येक पदार्थही देवाला प्रिय असतात अशी श्रद्धा आहे. याच मान्यतेनुसार, बजरंगबलींना चमेलीचे तेल आणि सिंदूर एकत्र अर्पण केल्यास ते प्रसन्न होतात आणि आपल्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात असे म्हणतात.



### रुईच्या अकरा पानांची माळ का घालतात?

हनुमानजींना रुईच्या पानांची माळ घातली जाते. खास करुन शनिवारी रूईची पाने आणि फुले एकत्र करून तयार केलेली माळ मारुतीरायांना अर्पण केली जाते. यामागे एक आख्यायिका आहे. हनुमानजींची माता अंजनी या गणेशभक्त होत्या. आपल्या पुत्रावर गणरायांची कृपादृष्टी सदैव रहावी अशा त्या माऊलीची इच्छा होती. गणराया म्हणजे साक्षात बुद्धीची देवता, विघ्नहर्ता त्यांचा आशीर्वाद बाळाला मिळावा म्हणून माता अंजनी हनुमानजींच्या गळ्यात मंदार किंवा रुईच्या पानांची माळ घालीत असे. आपल्या मातेची स्मृती म्हणून हनुमानजी रुईची माळ गळ्यात धारण करू लागले म्हणून भक्तगण त्यांना रुईच्या पानांची माळ घालतात. रूईची अकरा पाने वापरतात कारण शिव पुराण आणि इतर धार्मिक ग्रंथांनुसार हनुमानजी हे भगवान शिवाचे रुद्रावतार आहेत, जे अकरा रुद्रपैकी सर्वात शक्तीशाली मानले जातात. म्हणून तर मारूतीरायांना अकरा पानांची माळ आणि अकरा प्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे.

### हनुमानजींना सिंदूर का अर्पण करतात?

हनुमानजींना सिंदूर प्रिय आहे कारण माता सीता सिंदूर लावत होत्या. याबद्दल असे सांगितले जाते की, लंकेवर विजय मिळाल्यानंतर अयोध्येत एकदा माता सीता सिंदूर लावत होत्या. तेव्हा हनुमानजी त्यांना उत्सुकतेने पाहत होते. सीतामाईंनी विचारले, "हनुमान, तू काय पाहतो आहेस?" तेव्हा हनुमानजी म्हणाले, "माते, तुम्ही हा सिंदूर का लावता?" सीतामाईंनी सांगितले की, "प्रभु राम यांच्या दीर्घायुष्यासाठी." हे ऐकून हनुमानजी आनंदी झाले. नंतर रामदरबारात ते संपूर्ण शरीरावर सिंदूर लावून आले. हे पाहून सगळेजण हसले. तेव्हा प्रभु रामांनी विचारले, "हनुमान, हे काय आहे?" त्यावर हनुमानजी म्हणाले, "प्रभु माता सीता

तुमच्या दीर्घायुष्यासाठी कपाळावर सिंदूर लावतात, त्यामुळे मी जर संपूर्ण शरीरावर शेंदूर लावला तर तुमचे आयुष्य अधिक वाढेल. तुम्ही अधिक प्रसन्न व्हाल." हनुमानजींचे हे प्रेम पाहून प्रभु राम हसले आणि तेव्हापासून हनुमानजींना प्रसन्न करण्यासाठी त्यांना शेंदूर अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली. भक्ती, त्याग आणि निस्वार्थ प्रेम याचं प्रतीक म्हणून बजरंगबली यांना सिंदूर लावला जातो. समर्थ रामदास स्वामी यांनी मारुती स्तोत्रात पाताळ देवता हंता, भव्यसिंदुर लेपना असे म्हणत हनुमान आणि सिंदूर यांचा उल्लेख केलेला आहे.



# मृत्यु से भय कैसा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजा परीक्षित को श्रीमद्भागवत पुराण सुनातें हुए जब शुकदेव जी महाराज को छह दिन बीत गए और तक्षक ( सर्प ) के काटने से राजा परीक्षित की मृत्यु होने का एक दिन शेष रह गया, तब भी राजा परीछित का शोक और मृत्यु का भय दूर नही हुआ।

अपने मरने की घड़ी निकट आती देखकर राजा का मन क्षुब्ध हो रहा था। तब शुकदेव जी महाराज ने परीक्षित को एक कथा सुनानी आरंभ की। राजन! बहुत समय पहले की बात है, एक राजा किसी जंगल में शिकार खेलने गया। संयोगवश वह रास्ता भूलकर बड़े घने जंगल में जा पहुँचा। उसे रास्ता ढूंढते-ढूंढते रात्रि पड़ गई और भारी वर्षा पड़ने लगी।

जंगल में सिंह व्याघ्र आदि बोलने लगे। वह राजा बहुत डर गया और किसी प्रकार उस भयानक जंगल में रात्रि बिताने के लिए विश्राम का स्थान ढूंढने लगा।

रात के समय में अंधेरा होने की वजह से उसे एक दीपक दिखाई दिया। वहाँ पहुँचकर उसने एक गंदे बहेलिये की झोंपड़ी देखी । वह बहेलिया ज्यादा चल-फिर नहीं सकता था, इसलिए झोंपड़ी में ही एक ओर उसने मल-मूत्र त्यागने का स्थान बना रखा था। अपने खाने के लिए जानवरों का मांस उसने झोंपड़ी की छत पर लटका रखा था। बड़ी गंदी, छोटी, अंधेरी और दुर्गंधयुक्त वह झोंपड़ी थी। उस झोंपड़ी को देखकर पहले तो राजा ठिठका, लेकिन पीछे उसने सिर छिपाने का कोई और आश्रय न देखकर उस बहेलिये से अपनी झोंपड़ी में रात भर ठहर

जाने देने के लिए प्रार्थना की।

बहेलिये ने कहा कि आश्रय के लोभी राहगीर कभी-

कभी यहाँ आ भटकते हैं। मैं उन्हें ठहरा तो लेता हूँ, लेकिन दूसरे दिन जाते समय वे बहुत झंझट करते हैं। इस झोंपड़ी की गंध उन्हें ऐसी भा जाती है कि फिर वे उसे छोड़ना ही नहीं चाहते और इसी में ही रहने की कोशिश करते हैं एवं अपना कब्जा जमाते हैं। ऐसे

झंझट में मैं कई बार पड़ चुका हूँ।।

इसलिए मैं अब किसी को भी यहां नहीं ठहरने देता। मैं आपको भी इसमें नहीं ठहरने दूंगा।

राजा ने प्रतिज्ञा की कि वह सुबह होते ही इस झोंपड़ी को अवश्य खाली कर देगा। उसका काम तो

बहुत बड़ा है, यहाँ तो वह संयोगवश भटकते हुए आया है, सिर्फ एक रात्रि ही काटनी है।

बहेलिये ने राजा को ठहरने की अनुमति दे दी, पर सुबह होते ही बिना कोई झंझट किए झोंपड़ी खाली कर देने की शर्त को फिर दोहरा दिया। राजा रात भर एक कोने में पड़ा सोता रहा। सोने में झोंपड़ी की दुर्गंध उसके मस्तिष्क में ऐसी बस गई कि

सुबह उठा तो वही सब परमप्रिय लगने लगा। अपने जीवन के वास्तविक उद्देश्य को भूलकर वहीं निवास करने की बात सोचने लगा। वह बहेलिये से और ठहरने की प्रार्थना करने लगा। इस

पर बहेलिया भड़क गया और राजा को भला-बुरा कहने लगा। राजा को अब वह जगह छोड़ना झंझट लगने लगा और दोनों के बीच उस स्थान को लेकर बड़ा विवाद खड़ा हो गया। कथा सुनाकर शुकदेव जी महाराज ने परीक्षित से पूछा," परीक्षित ! बताओ, उस राजा का उस स्थान पर सदा के लिए रहने के लिए झंझट करना उचित था ? परीक्षित ने उत्तर दिया, 'भगवान्! वह कौन राजा था, उसका नाम तो बताइये ? वह तो बड़ा भारी मूर्ख जान पड़ता है, जो ऐसी गंदी झोंपड़ी में, अपनी प्रतिज्ञा तोड़कर एवं अपना वास्तविक उद्देश्य भूलकर, नियत अवधि से भी अधिक रहना चाहता है। उसकी मूर्खता पर तो मुझे आश्चर्य होता है। 'श्री शुकदेव जी महाराज ने कहा,' हे राजा परीक्षित ! वह बड़े भारी मूर्ख तो स्वयं आप ही हैं। इस मल-मूल की गठरी देह ( शरीर ) में जितने समय आपकी आत्मा को रहना आवश्यक था, वह अवधि तो कल समाप्त हो रही है। अब आपको उस लोक जाना है, जहाँ से आप आएं हैं। फिर भी आप झंझट फैला रहे हैं और मरना नहीं चाहते। क्या यह आपकी

मूर्खता नहीं है?' राजा परीक्षित का ज्ञान जाग पड़ा और वे बंधन मुक्ति के लिए सहर्ष तैयार हो गए।

वास्तव में यही सत्य है। जब एक जीव अपनी माँ की कोख से जन्म लेता है तो अपनी माँ की कोख के अन्दर भगवान से प्रार्थना करता है कि हे भगवान्! मुझे यहाँ ( इस कोख ) से मुक्त कीजिए, मैं आपका भजन-सुमिरन करूँगा।

और जब वह जन्म लेकर इस संसार में आता है तो ( उस राजा की तरह हैरान होकर ) सोचने लगता है कि मैं ये कहाँ आ गया ( और पैदा होते ही रोने लगता है )

फिर उस गंध से भरी झोंपड़ी की तरह उसे यहाँ की खुशबू ऐसी भा जाती है कि वह अपना वास्तविक

उद्देश्य भूलकर यहाँ से जाना ही नहीं चाहता है।

यही मेरी भी कथा है और आपकी भी।





# एकादशीचा उपवास द्वादशीलाच का सोडावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शास्त्र व पुराणानुसार एकादशीचे व्रत अत्यंत महत्वाचे व्रत समजले जाते. हा उपवास एकादशीच्या संपूर्ण दिवसभराचा असून दुसऱ्या दिवशी म्हणजे द्वादशीला सोडावा असं शास्त्रात व पुराणात सांगितलं जातं. असं का? सृष्टीचे पालनकर्ता भगवान विष्णू आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठुमाऊलीच्या प्रेमासाठी हे व्रत अनेक भाविक, वारकरी नियमित करत असतात. याशिवाय रोजची चपाती भाजी खाऊन कंटाळा आला म्हणून उपवासाचे पदार्थ खायला मिळावे यासाठीही अनेक जण करतात. पण या व्रताचे काही नियम आहेत. त्यातीलच एक म्हणजे उपवास दुसऱ्या दिवशी द्वादशीला सोडला जातो.

एकादशी उपवासाचे मुख्य दोन प्रकार आहेत, स्मार्त आणि भागवत. बहुतांश वारकरी मंडळी भागवत पद्धत मानतात. तर स्मृतींना मानणारे लोक स्मार्त एकादशीचे व्रत करतात.एकादशीचा उपवास का करतात? एकादशीच्या व्रताविषयी अनेक कथा आहेत.त्यातलीच एक देव दानव युद्धाची कथा आहे.


कुंभ नावाच्या राक्षसाचा मुलगा मृदुमान्य याने तप करून शंकराकडून अमरपड मिळविळे. त्यामुळे तो ब्रह्मदेव, विष्णू, शिव अशा सर्वांपेक्षा तो बलवान झाला होतो. त्याच्या भीतीने सर्व देव त्रिकूट पर्वतावर एका गुहेत लपून बसले होते. त्या दिवशी एकादशी होती. त्यांनी आषाढी एकादशीचा उपवास केला आणि या उपवासामुळे त्यांना शक्ती मिळाली. त्यानंतर सर्व देवांनी गुहेच्या दाराजवळ बसलेल्या मृदुमान्य राक्षसाला ठार मारलं. ही शक्ती म्हणजे एकादशी असे सांगण्यात येते. एकूण एकादशी व्रतामागे अनेक कथा सांगितल्या जात असल्या तरी त्याचा अर्थ जन कल्याण एवढाच आहे. उपवास द्वादशीलाच का सोडतात?एकादशीचा उपवास बहुतांश दुसऱ्या दिवशी द्वादशीला सोडला जातो. परंतु द्वादशीच्या सूर्योदयानंतर द्वादशीचा चौथा भाग येत असेल तर त्या काळात उपवास सोडू नये असे मानले जाते. हा काळ संपल्यावरच उपवास सोडतात. हा काळ पंचांगात दिलेला असतो.

द्वादशीला वारकरी संप्रदायात फार महत्व आहे. या दिवशी भगवंत प्रकट झाल्याची मान्यता असून बार्शीला भगवंत मंदिरात शेकडो वर्षांपासून भगवंत प्रकट उत्सव साजरा होतो. एकादशीचा उपवास केल्यावर वारकरी द्वादशीच्या परण्याला म्हणजे उपवास सोडायला बार्शीला भगवंत दर्शनाला जातात. आणि उपवास सोडतात. याची कथा

अंबरीश ऋषी हे एकादशीचे निर्जल व्रत रत असे. संपूर्ण दिवस पाण्याचा थेंबही न घेता द्वादशीला सूर्योदयाला भोजन करून उपवास सोडत. एकदा एकादशीला दुर्वास ऋषी हे अंबरीश ऋषींच्या आश्रमात आल्यावर दुर्वास ऋषींना त्यांनी द्वादशीच्या भोजनास थांबण्याची विनंती केली. दुर्वास ऋषींनी मान्यता देऊन नदीवर गेले. सूर्यास्त होऊनही ते परत न आल्याने अंबरीश ऋषींसमोर प्रश्न उभा राहिला. अखेर त्यांनी थेंब भर पाणी पिऊन उपास सोडला आणि यजमान येण्याआधी भोजन न करता त्यांचा मानही ठेवला. मात्र दुर्वास ऋषींना ही गोष्ट समजल्यावर ते चिडले. अंबरीश ऋषींना १० जन्म घ्यावे लागतील, असा शाप दिला. यानंतर भगवंताने आपल्या भक्तावरील हा शाप स्वतःवर घेतला. आणि त्यांनी दहा अवतार घेतले, अशी मान्यता वारकरी संप्रदायात आहे.

# महर्षी अत्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



प्राचीन काळातील महान तपस्वी ऋषी म्हणजे अत्री ऋषी. ब्रह्मदेवांच्या आशीर्वादाने वाग्देवीला झालेला पुत्र म्हणजे अत्री ऋषी. त्यांची वृत्ती अतिशय शांत व संयमी होती. तीन गुणांच्या पलीकडे गेलेले, त्रिगुणातीत म्हणून त्यांचे नाव अत्री. त्या काळात खूप मोठे गुरुकुल ते चालवत असत. हजारो शिष्य तेथे नानाविध प्रकारचे शिक्षण घेत असत. त्यांची पत्नी अनसूया, कर्दम ऋषी व देवहूती यांची कन्या. अत्री ऋषींच्या तीर्थयात्रा काळात तिने वर्षानुवर्षे गुरुकुल सांभाळले.

ऋग्वेदातील ५ वे मंडल अत्री मंडल म्हणून ओळखले जाते. ते वैदिक काळातील मंत्रद्रष्टा ऋषी होते. सूर्यग्रहणाचा शोध त्यांनी तुरिय नावाच्या यंत्राने लावला. पर्जन्य विज्ञानाचे ज्ञाते तसेच ज्योतिषशास्त्राचे श्रेष्ठ अभ्यासक म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक पर्जन्य सुक्ते रचली. ते लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. अयोग्य राज्यकर्त्याला तो राजवंशात जन्माला आला असला, तरी राजा करू नये यासाठी त्यांनी समाजजागृती केली. अत्री ऋषींनी लोकांना जीवन समजावले. जीवन जगण्याची दृष्टी दिली. भगवंताला प्राप्त करून घेण्यासाठी ध्येयनिष्ठ जीवन व जपाचे महत्त्व लोकांना सांगितले. अनेक वर्षे देशभ्रमण करून त्यांनी खूप मोठे समाजकार्य केले. प्राचीन मन्वंतरात त्यांनी ६२,००० श्लोकांचे रामायण रचले. त्यात रामायणातील सर्व प्रसंग विस्ताराने रंगवले आहेत. तसेच अत्रिसंहिता व अत्रिस्मृती हे त्यांचे दोन प्रमुख ग्रंथ आहेत.

ब्रह्मा विष्णू महेश यांच्या कृपाप्रसादाने त्यांना सोम, दत्तात्रय व दुर्वास असे तीन पुत्र झाले. आर्यवान हा चौथा पुत्र व एक ब्रह्मनिष्ठ कन्या होती. सप्तर्षीमध्ये त्यांचे स्थान आहे. राजगड जिल्ह्यात निर्विंध्या नदीच्या काठी त्यांचा आश्रम होता. अत्री ऋषींकडे ज्ञानी, कर्मयोगी, भक्त, सामान्य माणसे व पापी लोकही पापक्षालन कसे होईल, यासाठी जात असत. म्हणून 'अत्री सर्वांशी मैत्री' असे म्हणतात. त्यांना सादर वंदन.

# नवनाथांची नावे आणि परिचय...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवनाथ हा हिंदू धर्मातील नऊ महान संतांचा समूह आहे. ज्यांना नाथ पंथाचे प्रमुख मानले जाते. त्यांना भगवान शिवाचे अवतार मानले जाते आणि ते योग, तंत्र आणि अध्यात्माच्या खोल रहस्यांचे जाणकार होते. नवनाथांच्या कथा आणि त्यांनी केलेल्या अद्भुत कार्यांचे वर्णन नाथ पुराण आणि इतर धार्मिक ग्रंथांमध्ये केले आहे.

### नवनाथांची नावे आणि परिचय


**१) मच्छिंद्रनाथ (मत्स्येंद्रनाथ) :** मच्छिंद्रनाथ हे नवनाथांमध्ये सर्वांत प्रमुख मानले जातात. ते गुरू गोरखनाथांचे गुरू होते. योग आणि तंत्रावरील त्यांचे सखोल ज्ञान उल्लेखित आहे.

**२) गोरखनाथ (गोरक्षनाथ) :** गोरखनाथ हे मच्छिंद्रनाथांचे प्रमुख शिष्य होते. त्यांनी योग आणि तंत्राच्या पद्धतींचा विस्तार केला आणि नाथ पंथाचे संघटन केले.

**३) जालंधरनाथ (जालंधरनाथ) :** जालंधरनाथांनी योग आणि तंत्राचे खोल रहस्य देखील स्पष्ट केले आणि त्यांच्या अनुयायांना आध्यात्मिक मार्गावर जाण्यास प्रेरित केले.

**४) कानिफनाथ (कानिफनाथ) :** कानिफनाथ यांना कानिफनाथ असेही म्हणतात. ते तंत्र साधनेचे एक प्रमुख विद्वान होते आणि त्यांना अनेक अद्भुत शक्तींचे धारक मानले जाते.

**५) गहिनीनाथ (गहिनीनाथ) :** गहिनीनाथ यांनी नाथ पंथात औषध आणि आयुर्वेदाचे ज्ञान जोडले आणि अनेक रोगांवर उपचार करण्याच्या पद्धती शिकविल्या.



**६) भर्तृहरिनाथ (भर्तृहरिनाथ) :** योग आणि तंत्राव्यतिरिक्त, भर्तृहरिनाथ संगीत आणि साहित्याचेही विद्वान होते. त्यांना अनेक धार्मिक आणि तात्विक ग्रंथांचे लेखक मानले जाते.

**७) रेवणनाथ (रेवणनाथ) :** रेवणनाथ यांनी योग आणि तंत्र तसेच ध्यान आणि समाधीच्या पद्धतींवर सखोल ज्ञान दिले.

**८) चरपतनाथ (चरपतनाथ) :** चरपतनाथ यांनी योग आणि तंत्राच्या अभ्यासात विशेष योगदान दिले आणि त्यांच्या शिष्यांना आध्यात्मिक मार्गावर नेले.

**९) नागनाथ (नागनाथ) :** नागनाथ यांना नागवंशी असेही म्हणतात. त्यांनी नागा योग आणि तंत्राचे रहस्य उलगडले आणि ते त्यांच्या अनुयायांना शिकविले.

### नवनाथांची शिकवण आणि महत्त्व

**योग :** नवनाथांनी योगाचे विविध प्रकार विकसित केले आणि ते त्यांच्या शिष्यांना शिकविले. त्यांच्या योग पद्धतींनी केवळ शारीरिक आरोग्यच नाही तर मानसिक आणि आध्यात्मिक प्रगती देखील प्रदान केली.

**– तंत्र :** नवनाथांनी तंत्र साधनेचे खोल रहस्य उलगडले. त्यांच्या तांत्रिक पद्धती आणि मंत्र पद्धती आजही मोठ्या प्रमाणात पाळल्या जातात.

**– ध्यान आणि समाधी :** नवनाथांनी ध्यान आणि समाधीच्या पद्धतींवर भर दिला. त्यांनी विकसित केलेल्या ध्यान पद्धती आत्मसाक्षात्कार आणि मोक्ष मिळविण्यात उपयुक्त मानल्या जातात.

**– औषध आणि आयुर्वेद :** नवनाथांनी आयुर्वेद आणि वैद्यकीय शास्त्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या वैद्यकीय ज्ञानामुळे अनेक रोगांवर उपचार शक्य झाले.

### नवनाथांचा वारसा

नवनाथांच्या शिकवणी आणि त्यांनी स्थापित केलेल्या परंपरा आजही जिवंत आहेत. नाथ पंथाचे अनुयायी त्यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात आणि त्यांच्या शिकवणींचे पालन करतात. नवनाथांचे आश्रम आणि मंदिरे भारताच्या वेगवेगळ्या भागात आहेत. जेथे त्यांचे भक्त पूजा आणि साधना करतात. नवनाथांच्या कथा आणि त्यांच्या अद्भुत पद्धती आपल्याला अध्यात्म, योग आणि तंत्राच्या मार्गावर चालण्यास प्रेरित करतात. त्यांनी दिलेली शिकवण आजही आपल्या जीवनात मार्गदर्शक ठरते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)